महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/01/2023 (मंगळवार) सकाळ

## चोरी

**१) पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत ३२ कि.मी. अंतरावरील मौजा झिल्पी शिवार येथे दिनांक दि. १६/०१/२०२३ चे २०.०० वा. ते दि. १७/०१/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– घनश्याम किसनजी पीसे, वय ६८ वर्ष, रा. लोहगड वार्ड क्र. ०२ ता. कळमेश्वर यांनी त्याचे शेतात बांधुन ठेवलेले १) १ पांढऱ्या रंगाचा शिंगरा गोरा वय अंदाजे ०४ वर्ष किंमती अंदाजे २०,०००/–रू. २) १ पांढऱ्या रंगाचा शिंगरा गोरा वय ०३ वर्ष किंमती अंदाजे १०,०००/–रू. ३) ०१ तांबळया रंगाचा (भुरकट) गोरा वय अंदाजे ०३ वर्ष किंमती अंदाजे १०,०००/–रू. ४) ०१ पांढऱ्या रंगाची कारवड वय अंदाजे २ वर्ष किंमती अंदाजे ५०००/–रू. ५) एक गाय १५ दिवसाची असा एकुण ६५,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक कामठे मो. नं. ९९२३२१०३४४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत १६ कि.मी. अंतरावरील चारगाव मुंगलाई शिवार येथे दिनांक दि. १३/०१/२०२३ चे २१.३० वा. दरम्यान चारगाव शिवारातील मांडवा खिंड या बागातुन जाणाऱ्या ३३ के. व्ही. उच्चदाब वाहीनीचे लोखंडी पोल व ३०० मीटर अॅल्युमिनीयम वायर चोरी गेल्याचे आढळते. त्याची अंदाजे किंमत खालीलप्रमाणे नमुद करण्यात आली आहे. १.०५ लोखंडी पोल जुने किंमती प्रत्येकी पाच हजार रू. प्रमाणे एकुण किंमती अंदाजे २५,०००/– रू. व ३०० मीटर अॅल्युमिनीअम तार किंमती अंदाजे १५,०००/– रू. असा एकुण ४०,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्री. योगेश शामराव आरीकर, वय ३७ वर्ष, रा. आदर्श नगर प्लाट नं. ०९ नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ७५७ भोजराज झाडे मो. क्र. ८९९९४३४२७२ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत सावरगांव शेत शिवार येथे दिनांक दि. १६/०१/२०२३ चे २१.०० वा. ते १७/०१/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दामोधर प्रभाकर ठाकरे, वय ४१ वर्ष, रा. सावरगांव ता. मौदा यांची सात एकर शेती असुन फिर्यादी याने दि. १६/०१/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. दरम्याण मशिन मधुन १०८ पोते धान काढले होते. दि. १७/०१/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वा. दरम्यान शेतात गेले असता १०८ धानाचे पोते मधुन ११ पोते धान किंमती अंदाजे ३०,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक शिंदे ब.नं १९०९ मो. क्र. ९५५२५५६८६५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**